३२९८

अ/८/१३८

दक्षिणाप्राइज कमेटीनें पसंत करून
बक्षीस दिलें आहे.

No. 18 Rewarded
D
235

स्वदेशस्थिति.

सदाशिव मोरेश्वर भिडे

किंमत तीन आणे.

५२९६७
अ/४/४३८

या काव्यास दक्षिणाप्राइज कमेटीनें पसंत करून
बक्षीस दिलें आहे.

स्वदेशस्थिति.

हें काव्य

सदाशिव मोरेश्वर भिडे

स्कूल मास्तर गगनबावडा

यानें रचिलें.

तें
पुणें येथें
सदाशिव पेठेंत ' इंदिरा ' छापखान्यांत छापिलें.

शके १८१८—सन १८९६.

किंमत तीन आणे.

(या काव्यासंबंधी सर्व हक्क कर्त्यानें आपणाकडे ठेविले आहेत.)

हें काव्य

श्रीमंत राजश्री माधवराव मोरेश्वर

उर्फ

बाळासाहेब

पंतअमात्य हुकमतपन्हा बावडेकर;

यांस

यांच्या विद्याप्रियत्व सुधारणानुकूलत्व

प्रजावात्सल्य इत्यादि अनेक

गुणांस लुब्ध होऊन

त्यांच्या आज्ञेनें

ग्रंथकर्त्यानें नजर केलें आहे.

श्रीराम.

श्रीमाधव क्षितिप पंत अमात्य साजे ।
यत्कीर्ति-दुंदुभि समस्त महींत गाजे ॥
विद्वद्गुणज्ञ विनयी विनयी प्रदाता ।
ऐसा क्वचिन्नरमणी भुवनीं पहातां ॥ १ ॥

विद्येच्या व्यसनेंच निर्व्यसनिता ज्याची असे दूषिली ।
ना दे जो न उदारता म्हणुनियां तेणें उणी भासली ॥
ज्याचा सभ्यपणा प्रसन्न-मुखता ना ती कधीं ही ढळे ।
शोभे सद्गुण-धाम माधव असा राजा दुजा ना ढळे ॥ २ ॥

जाऊन वैद्यक-महांबुधिच्या तळाला ।
काढी रसायन-सदोषधि रत्नमाला ॥
आश्चर्य आंत न गमे द्विजराज जो कीं ।
अन्वर्थ-नाम नृप माधव होय लोकीं ॥ ३ ॥

जो आंग्ल-भाषा-पटु बोलतांना । ज्ञाते सदा डोलवितात माना ॥
सुधारणेचा सुखकंद छंद । धरी सुकार्व्यी सुमती अमंद ॥ ४ ॥

ज्याचे पूर्वज रामचंद्र-मुख ते पूर्वी स्वदेशस्थिती ।
शौर्यै बुद्धिबलें सुधारिति जनां सौख्यामधें ठेविती ॥
उत्तेजून गुणांस ते जिवविती देशांत विद्येप्रती ।
त्यांचें सद्व्रत नित्य चालवितसे हा बावड्याचा पती ॥ ५ ॥
देशोन्नति हे करितां भासे आहेत यांस बहुत कर ॥
म्हणुनि द्विकरहि भूवर मिरविति उपनाम थोर बहुत-कर ॥ ६
ऐसा श्रीरघुवीर सेवक भला श्रीमाधवक्ष्मापती ।
प्रेमें वंदुनि तन्निदेश वदनी हर्षे स्वदेशस्थिती ॥
तत्पादांबुजिं हा सदाशिव भिडे अर्पून " ही अल्पशी
सेवा मानुनि घ्या " विनंति वदतो सन्नम्रभावें अशी ॥७॥

स्वदेशस्थिति.

पूर्वस्थिति.

कोणी आर्य सुधारक सांगे प्रेमें निजरमणीला ।
निजदेशाचें स्थितिवर्णन हें योजुनि मृदुवाणीला ॥
सखये धन कीर्ती । विद्या देते या जगतीं ॥ १ ॥
प्राणसखे या देशीं पूर्वी क्षत्रिय राजे होते ।
प्रजापालनीं यथाशास्त्र जे दक्ष सदा गे होते ॥ २ ॥
सर्व वर्ण तैं स्वकीय धर्मी होते निरत सदा ते ।
त्या स्थितिला सखि सांप्रत ही जग उत्तम म्हणुनी गातें॥३॥
धनधान्यादिक विपुल, वृष्टि ही यथा काल तैं होई ।
दारिद्याचें नांव कधींही कर्णी न च गे येई ॥ ४ ॥
अनेक शास्त्रें वृद्धि पावलीं आज गमे नवलाई ।
प्रजासुखप्रद निजराज्यें तीं विलसति ठाईं ठाईं ॥ ५ ॥
नृपसिंहांनीं गजबजलेली आर्यभूमि पूर्वी ही ।
यवन कुंजरां प्रवेशलभ्या सुद्धां झाली नाहीं ॥ ६ ॥
बहुत यज्ञ ते करिती भूपति तेणें गगन सदा ही ।
दिसतें जाणों धूमसंचयें वरुनि नीलिमा राही ॥ ७ ॥

सत्य बोलती उगा न देती अन्य नृपांना ताप ।
जिंकुनि त्यांतें पुन्हा स्थापिती दाविति निजप्रताप ॥ ८ ॥
सहज-वैरिणी लक्ष्मी आणिक सरस्वती या दोनी ।
त्यांच्या ठायीं सतत राहुनी सेवा करिति जपोनी ॥ ९ ॥
शौर्याविण जी नीती भी ती गतनय शौर्य पशूचें ।
म्हणून तें नृप मेळविती जय संयोगें उभयांचे ॥ १० ॥
मनाप्रमाणें केवळ वर्तन ते नृप करीत नव्हते ।
मंत्रि-समंजस-सुजन विचारें सशास्त्र वागत होते ॥ ११ ॥

पूर्वस्थितींत बदल.

विचारशीले, पुढें जाहला धर्म कलह देशीं या ।
असंख्य तेणें धर्ममतांचे पंथ निघाले वायां ॥ १२ ॥
धर्ममतांनीं एकी केली नष्ट सकल लोकांची ।
लाभ मिळे हा रिपूंस देशीं शिरली झुंड तयांची ॥ १३ ॥
जिकडे तिकडे यवन, हिंदु हे परवश बहुधा झाले ।
तरीहि सखये तेज आमचें नव्हतें जाण निमालें ॥ १४ ॥
केवळ अश्रुत यवन नृपांची राज्यरीति नव्हती ती ।
म्हणून आम्हां तदाश्रेष्ठता तींतहि लाभत होती ॥ १५ ॥
यवन राहिले येथें वसती करून तेव्हां त्यांतें ।
प्रकट करूनी तेज लागलों सहजचि दिपवायातें ॥ १६ ॥

१ धर्मविजयी, लोभविजयी, आणि असुरविजयी असे राजांचे तीन प्रकार आहेत. जो शत्रूची राज्यश्री हरण करितो पण राज्य घेत नाहीं तो धर्मविजयी, जो शत्रूची शोभा आणि राज्य दोन्ही घेतो तो लोभविजयी आणि जो शत्रूस मारून त्याचें सर्व हरितो तो असुरविजयी, पैकीं पूर्वीचे राजे पहिल्या प्रकारचे असत असा भाव.

२ रघु. सर्ग १७ श्लो. ४७ कातर्यं केवला नीतिः शौर्यं श्वापद चेष्टितम् ॥ अतः सिद्धिं समेताभ्यामुभाभ्यामन्वियेष सः ॥ या श्लोकाशीं समानार्थक वरील साकी आहे.

विद्यालंकृत आर्य, यवन ते अज्ञ रानटी मोठे ।
प्रकाश आणिक अंधकार या समता येइल कोठें ? ॥ १७ ॥
भूप शिवाजी घाली आधीं राज्य-मंदिरा पाया ।
तदनुकारि मग शूर पेशवे झटती वृद्धि कराया ॥ १८ ॥
सर्वहि पृथ्वी जिंकावी या धरिलें उत्साहातें ।
परि दैवाची विचित्र लीला कळते कां कोणातें ? ॥ १९ ॥
आम्हांहुनि ही फार शाहणे साहस-कर्मे भारी ।
इंग्रज आले व्यापाराला स्थापिति थोर वखारी ॥ २० ॥
ठायीं ठायीं आर्जवशक्ती वेंचुनि मिळविति जागा ।
त्यास जयश्री माळ घालिते स्वहिता जो बहु जागा ॥ २१ ॥
कलहीं पडणें, उदीम करणें, सेवा करणें, ऐशा ।
तिहीं उपायीं राज्य मिळविण्या त्यांस लागली आशा ॥ २२ ॥
यवनायवनी, हिंदुहिंदुचे यवनाहिंदुचे कलहीं ।
पडती, हिंदू यवन यांजशीं लढती प्रत्येकीं ही ॥ २३ ॥
सामदाम नी दंड भेद हे उपाय करिती चार ।
एकादश* तन्मिश्र भाग ते योजिति अनेक वार ॥ २४ ॥
चातुर्यानें जन संतोषें जिंकिति सर्वहि देश ।
सार्वभौम हे होती करिती आम्हां पूर्ण हताश ॥ २५ ॥
जीवनार्थ हा कलह चालला सृष्टीमध्यें मोठा ।
बुद्धि-शक्तिनीं अधिक तयांचा लाभ दुजांचा तोटा ॥ २६ ॥

आमचे मध्यकालीन विचार.

देश विलायत इंग्रेजांचा स्वतंत्र होय परंतु ।
आर्य देश परतंत्रपणामधिं बुडतो सखि पाहा तूं ॥ २७ ॥

---

* १ सामदाम २ सामदंड ३ सामभेद ४ दामदंड ५ दामभेद ६ दंडभेद ७ सामदामदंड ८ सामदामभेद ९ दामदंडभेद १० सामदंडभेद ११ सामदामदंडभेद. मिळून आकरा.

इंग्लंदांतिल लोकेच्छा जी तोच कायदा होतो ।
येथें परिगे लोकमतातें कवणहि नच पुसतो तो ॥ २८ ॥
पूर्वी यांच्या राज्यरीतिचें ज्ञान न आम्हां कांहीं ।
जनमत नामें पदार्थ कसला माहित नव्हतें हें ही ॥ २९ ॥
इंग्रेजांच्या सहवासें परि सर्व कळूं लागे हें ।
सत्य जाण सखि विद्वत्संगति कदापि निर्फळ नोहे ॥ ३० ॥
पूर्वी आम्ही नाना-विद्या-पारंगत बहु होतों
इंग्रेजांची केवळ होती स्थिति वन्याच तदा तों ॥ ३१ ॥
पुढतीं आम्ही व्यवहाराला गणिलें अगदीं नीच ।
आत्म-विचारीं मग्न जाहलों शास्त्रें लिहिलीं तींच ॥ ३२ ॥
क्रमाक्रमानें इंग्रज परि हे सुधारले बहुरीती ।
व्यवहाराचे विचार सखये सोडुनि ते नच देती ॥ ३३ ॥
परवशतेच्या व्यसन[1]-सागरीं अस्मद्विद्या-नौका ।
बुडून गेली हाच बसे गे आह्मा मोठा धक्का ॥ ३४ ॥
इंग्रेजांनीं जगतामधल्या सर्व जनांचे ग्रंथ ।
धुंडाळोनी सुधारिला गे सुधारणेचा पंथ ॥ ३५ ॥
अधर्म होतो समुद्र तरुनी गेलें जर परदेशीं ।
बद्धचि करिती आह्मांलागीं धर्ममतें हीं ऐशीं ॥ ३६ ॥
आम्हीं भारी अज्ञ असो हें तत्व वसे मनिं मोठें ।
पूर्वीच्या त्या ग्रंथसमुद्रा बघतां अद्भुत वाटे ॥ ३७ ॥
पूर्वीचे जन देवच साक्षात् आह्मां शक्ति न तैशी ।
क्रमें होतसे जग हें मूर्खच मतें जाहलीं ऐशीं ॥ ३८ ॥
विचार झाले हीन यापरी नवीन न सुचे कांहीं
पूर्व-ग्रंथां प्रमाण मानुनि त्यांतच रमलों पाहीं ॥ ३९ ॥

---

१ संकट.

नवीन कोणीं करितां त्यांची भारी निंदा केली ।
तत्कृति केल्या विनष्ट तेणें ज्ञानवृद्धि नच झाली ॥ ४० ॥
ऐहिक गोष्टीविषयीं करणें तर्क मौर्ख्य[2] पहिलें हें ।
प्राचीनाहुनि नवीन करणें दुसरें ठरलें पाहें ॥ ४१ ॥
आर्येतर जन मूर्ख असति हें पूर्व ग्रंथीं बघोनी ।
वागुं लागलों पुढें सदाही तेंच सत्य मानोनी ॥ ४२ ॥
म्लेच्छजनांची भाषा वदणें आइकणेंही पाप ।
ऐसें ठरवुनि औदुंबरफल-कीटक[3] झालों साफ ॥ ४३ ॥
ज्ञान सांठलें आम्हांमध्यें दुजां समीप न कांहीं ।
मिळेल त्यांना पुढेंहि न कधीं असें मानिलें पाहीं ॥ ४४ ॥

---

१ मुक्तेश्वरानें भारत केलें तें मूळाहून सरस आहे असें वाटलें तरी व्यासाचा अपमान होतो या भीतीनें एकनाथांनीं तें गंगेंत बुडविलें, पहिलीं चार पर्वें मात्र शिल्लक राहिलीं, अशी कथा आहे. नवीन असेल तें कोणत्या तरी पर्यायानें दूषित करावें व जुनें चांगलें म्हणावें अशी सर्वत्र स्थिति असते; परंतु आमचे देशांत ती विशेष. त्यांतही ऐहिकहितसंबंधाच्या गोष्टींचा तर तिरस्कार फारच. ज्योतिषादि ग्रंथाची व ते अध्ययन करणारांची कशी निंदा होत असे हें खालील श्लोकावरून दिसून येईल.

मीमांसा पठिता न यैरुपनिषन्नैव श्रुता तत्वतः
श्रीमच्छंकर-भाष्यतो भगवती गीताप्यधीता न यैः ।
सिद्धांतापगतं शिरोमणिमतं ज्ञात्वापि किंचित्ततो
भट्टाचार्यपदं गताः कथमहो लज्जां लभंते न ते ॥

२ दुसरें मूर्खपण. ३ उंबराच्या झाडाच्या फळांतील कीटकाप्रमाणें. त्या किडयांस जग म्हणजे काय तें फल असें वाटतें. त्या फलाबाहेर कांहीं जग असेल अशी कल्पना नसते त्याप्रमाणें आह्मांस हिंदुस्थान हीच कायती पृथ्वी असें वाटूं लागलें, हा भाव.

विरुद्ध याच्या कोणी वदतां नास्तिक वदती त्याला ।
नानोपायीं[1] तन्मत तोही विनष्ट सखये केला ॥ ४५ ॥
प्रत्यक्षहि जरि गोष्टी दिसल्या तरि त्या गणिल्या खोट्या ।
ऐशा कांहीं बुद्धि आमच्या झाल्या विचित्र मोठ्या ॥ ४६ ॥
गोष्टी धर्मी सर्व गोंविल्या जखडुनि गेलों धर्में ।
परी सर्व तीं ओढवलीं गे आतां अस्मत्कर्में ॥ ४७ ॥
आम्हांपेक्षां चतुरजनांशीं गांठ पडे तों गेलों ।
सहजच त्यांच्या हातीं तद्वश सर्वपरींनीं झालों ॥ ४८ ॥

मध्यम स्थितींतील चांगुलपणा.

महमद-धर्मी लोक यावया पूर्वीची ती आद्या ।
तदनंतरची आंग्लाऽगमनावधि समजे स्थिति मध्या ॥ ४९ ॥
तदुत्तरा ती तिसरी सखये तुझ्या समजुतीसाठीं ।
अशी व्यवस्था केली आहे या विषयाच्या पोटीं ॥ ५० ॥
पहिल्या स्थितिचा इतिहास नसे माहित या जगतीला ।
परंतु कांहीं गोष्टीवरुनी समजों निजस्थितीला ॥ ५१ ॥
ती स्थिति उत्तम होती म्हणुनी प्रथमचि कथिलें तूतें ।
मधलीचें परि एक अंग तुज सांगितलें आतां तें ॥ ५२ ॥
दुजें सांगतों विद्याशीलें आम्हांतें सुखकारी ।
त्या स्थितिला सखि जाणतसों गे संप्रति आम्ही भारी ॥ ५३ ॥
इतिहास बहू लिहिले असती अस्मत्पराक्रमाचे ।
तद्गुण-वर्णनपर असती बहु लेखहि पाश्चात्यांचे ॥ ५४ ॥
भरत भूमिनभिं केव्हां केव्हां विद्वन्नक्षत्रें तीं ।
चमकुनि कोठें कोठें दुर्मत-तमास विलया नेतीं ॥ ५५ ॥

---

[1] बौद्धधर्मी लोक व तें मतही नष्ट केलें या गोष्टीवर कटाक्ष ठेवून ही उक्ति आहे.

अभूत-पूर्व-प्रताप-कर्ते वीर निपजले जेव्हां ।
दिल्लिपुरीची म्लेच्छश्रीही कंपित झाली तेव्हां ॥ ५६ ॥
स्वाध्यायादि स्वकर्म सोडुनि यवना लज्जा देते ।
रणपंडित हे ब्राह्मण होतिल कवणा गमलें होतें ॥ ५७ ॥
खड्गलेखनी करुनि अरीच्या रक्तरूप शाईनें ।
रणभूमीवर युद्धग्रंथा लिहिती जग ज्या वानें ॥ ५८ ॥
फडके रास्ते पटवर्धन अशिं ब्राह्मण कुलें कितीच ।
रणशास्त्री तीं झालीं ज्यांचा रिपूंस मोठा जाच ॥ ५९ ॥
वीर-रूप ते तेजोगोलक असंख्य हिंदुस्थानीं ।
तळपत असतां यवन जलद ते विरघळती स्वस्थानीं ॥६०॥
अज्ञान-तमोध्वंसक तेव्हां अवतरले किती साधू[1] ।
किति यद्बोधां ऐकुनि झाले समर्थ सुखपद साधू ॥ ६१ ॥
असे किती कवि[2] झाले ज्यांचीं ऐकुनि काव्यें सारें ।
होय चकित जग ईश-भक्तिचें अंगीं भरारे वारें ॥ ६२ ॥
वीर रसानें पूर्ण पवाडे गातां उंच सुरांत ।
मराठियांच्या स्त्रियाहि वीरश्रीनें भरुनी जात ॥ ६३ ॥
असे शाहणे[3] कितीक झाले ज्यांचें बघतां ज्ञान ।
सप्तज्ञानी ग्रीसांतिल ही मानावे ते ऊन ॥ ६४ ॥
मुत्सद्दी[4] किति झाले तेव्हां ज्यांचे विचार नीट ।
बघतां संप्रति थोर थोर ही मुखीं घालिती बोट ॥ ६५ ॥
राजभक्ति, निज-देश-प्रेमा ज्यांना वाटे थोरें ।
स्वप्राणाहुनि, कितीक झाले ऐसे लोक उदार ॥ ६६ ॥

---

१ तुकाराम, रामदास वगैरे. २ वामन तुकाराम वगैरे. ३ रामदास, ज्ञानदेव वगैरे. ४ प्रल्हादनिराजी, रामचंद्र निळकंठ, शिवाजी वगैरे ५ संढोबल्लाळ, शंकराजी नारायण, रामचंद्रपंत वगैरे. संढो

(पुढें चालू)

बसुनि महालीं खावें प्यावें विलास-मग्न असावें ।
अशाहि भूपति-विलासिनींनीं रणांगणीं कां जावें ? ॥ ६७ ॥
परंतु होता कालच सखये मजेदार तो भारी ।
निरुपम ऐशा कितीच झाल्या हिंदुस्थानीं नारी ॥ ६८ ॥
समरीं ज्यांनीं शत्रु मर्दिले घेउनि करिं तरवारी ।
किंवा ज्यांनीं मुत्सद्यांसहि लाजविलें स्वविचारीं ॥ ६९ ॥
अथवा ज्यांनीं राज्य शकट ही सुयंत्र चालविले कीं ।
पतिव्रताही कितीक झाल्या नारी अस्मल्लोकीं ॥ ७० ॥
उमा, अहल्या, रमा, गौतमी झाल्या कितीच ऐशा ।
यन्नामानें पापें जळतीं भूषा अस्मद्देशा॥ ७१ ॥

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

बल्लाळांनीं एकदां संभाजीचा समुद्रांत व एकदां शाहूचा मृगयेंत जीव बचाविला होता, त्या वेळीं त्यांनीं आपल्या जिवाकडे पाहिलें नाहीं. शंकराजीनें तर राज्य मिळविण्याचे कामांत पराकाष्टेची मदत केली, व शाहूच्या पक्षास मिळावें तर वचनभंग होतो, न मिळावें तर स्वामिद्रोह होतो; म्हणून जीवंत समाध घेतली. रामचंद्रपंत हे तर सुप्रसिद्धच आहेत. यांनीं स्वस्वामी जे करवीरकर यांच्याविषयीं फारच अभिमान धरून स्वतःचा फायदा न पहातां राज्यवृद्धि केली. कर्तबगारीप्रमाणें पाहिलें तर संस्थान फार लहान. १ रायबागीण देशपांडीण ही वीरांगणा शिवाजीच्या वेळीं सर्व राजांना मोठी दुर्जय होती. असेरीस शिवाजीनें हिचा पराभव केला. (म. सा. छोटी बखर.) उमाबाई दाभाडीण हिनें शूरपणा गाजवून अमदाबाद घेतली तेव्हां शाहूमहाराजांनीं सोन्याचे तोडे बक्षीस दिले (दाभा. बखर.) ताई तेलीण गोखल्यांची प्रतिस्पर्धिनी. २ अहिल्याबाई, यायजाबाई, ताराबाई, सईबाई, जिजाबाई कोल्हापुरकरीण. ३ अहिल्याबाई, यायजाबाई, जिजाबाई. ४ अहिल्याबाई, इत्यादि. ५ उमाबाई दाभाडी.

(पुढें चालू)

मध्यम कालीं प्राणवल्लभे श्रीरामोपरि भूप ।
अनेक झाले दीन-जनावीनि ज्यांना मोठी हूप ॥ ७२ ॥
आम्हां मधल्या सामाजिक ही गोष्टी सुधारण्यातें ।
झाला होता प्रारंभ तरी अर्धे काम पडे तें ॥ ७३ ॥
ऐशा असती कितीक गोष्टी पुरतीं त्या न लिहून ।
वाचूं जातां पहिल्या बखरी येती सर्व कळून ॥ ७४ ॥
गत गोष्टी या अस्मच्चित्ता हर्षद असती फार ।
असति अमुच्या त्या म्हणुनी गे अभिमान गमे थोर ॥७५॥
त्या पासुनियां अनेक परिचा बोध मिळे आम्हांस ।
अंगीं योग्यता असे आमच्या हा वाटे विश्वास ॥ ७६ ॥
पहिल्या स्थितिचें तेज आमचें मध्य-स्थितींत होतें ।
किंवा त्याहुनि अधिक चमकलें निःसंशय वाटे तें ॥ ७७ ॥
दुर्दैवानें परि प्रिये तें सुस्थिर झालें नाहीं ।
किंवा नाहीं वेळ मिळाला भरपुर आम्हां पाही ॥ ७८ ॥
घर घेउनि जे थार न आम्हां देती त्या यवनांतें ।
दंडुनि पूर्व द्वारें हुसकुनि लागूं जों द्यायातें ॥ ७९ ॥
तंव हे घुसले पश्चाद्वारें इंग्रज बोलत गोड ।
तोड न ऐसा हुन्नर[3] करुनी करिती अमुचा मोड ॥ ८० ॥
हिंदू इंग्रज उन्नतिसाठीं समरांगणिं हे ठेले ।
हरले हिंदू डाव सुशीले परवशपण हें आलें ॥ ८१ ॥

(मागील पृष्ठावरून पुढें चालू).

ही वीरांगना होती, अहिल्याबाई होळकरीण पतिव्रता, रमाबाई पेशवे साध्वी, गोतमाबाई शिंदे, दत्ताजीची स्त्री हिचा जनकोजीस उपदेश वीरांगनेस शोभण्यासारखा आहे. १ शिवाजी, माधवराव. २ पुनर्विवाह, परदेशगमन, कोंकणस्थ देशस्थ कऱ्हाडे यांत शरीरसंबंध, कन्याविक्रय प्रतिबंध इ० सुधारणा पेशवाईंत होऊं लागल्या होत्या असें दिसतें. ३ युक्ति.

इंग्रजांचें विचार व उद्योग.

उत्तरोत्तर प्रगति जगाची इंग्रज मानिति ऐसें ।
त्यांची व्हाया सुधारणा हें कामीं पडलें खासें ॥ ८२ ॥
जुन्या पुस्तकीं जें जें लिहिलें सत्य सदा तें नोहें ।
काल-देश-जन-भेदीं फिरतें तन्मत ऐसें आहे ॥ ८३ ॥
हर गोष्टींतिल हेतु जाणिल्या विना न करिती कांहीं ।
म्हणुनि अहेतुक गोष्टी बहुधा त्यांत न उरल्या पाहीं ॥८४॥
सर्वहि गोष्टी नसती धर्मीं समावेशिल्या त्यांनीं ।
व्यवहाराहुनि धर्म निराळा ऐसें जन तो मानी ॥ ८५ ॥
ज्ञान आपणाजवळ कायतें आपण सर्व-श्रेष्ठ ।
मूर्ख इतर जन, नव्हतें नाहीं ऐसें तन्मत दुष्ट ॥ ८६ ॥
आकल्पांत ज्ञान-हीन ते स्वेतर जन असतील ।
भ्रममूलक हें व्यर्थ अहंपण कैसें त्यांस शिवेल ॥ ८७ ॥
जगांत चाले काय सदा हें नेत्रीं घालुनि तेल ।
पाहुनि घेती हितकर तें ते विचार करुनी खोल ॥ ८८ ॥
व्यवहाराचीं शास्त्रें त्यांनीं रचिलीं यत्न करोनीं ।
शब्दवाद ते शुष्क जाणुनी सर्व दिले सोडोनी ॥ ८९ ॥
उद्योगानें दैव वाद तो त्यांनीं असत्य केला ।
त्यांची प्रयत्न-सिद्धि पाहुनी सुरगण लज्जित झाला॥ ९० ॥
महाभयंकर वीज तयांनीं दूती केली आहे ।
दिवे लाविते वाहक होते सेवे तत्पर राहे ॥ ९१ ॥
वायु आणितो पाणी, दळितो धान्य, दूतता घेतो, ।
सारथ्यातें बाष्प करितसे, समुद्र वाहन होतो, ॥ ९२ ॥
गगन तयांचें विमान नेतें पाठीवर वाहोनी ।
निर्जीवहि त्या वस्तु सांगती वेळ तयास टिपोनी ॥ ९३ ॥

नद्या तयांचीं वस्त्रें विणिती सुदक्ष वाफेसंगें ।
पृथ्वी झाली सदा प्रसन्ना विदारितांही अंगें ॥ ९४ ॥
चित्रकार रवि झाला काढी सुंदर चित्रें नित्य ।
पांचहि भूतें सर्व तयांचीं कामें करितीं सत्य ॥ ९५ ॥
अलीकडे जें डार्विन यानें प्राणिशास्त्र नव केलें ।
तेणें झाली सृष्टि कशी हें ज्ञात तयांना झालें ॥ ९६ ॥
वाटे पुढतीं प्रति-सृष्टिहि हे करितिल कैक दिसांनीं ।
देवहि होईल चकित गमे कीं यांची बुद्धि बघोनी ॥ ९७ ॥
एक-राज-कृत-सत्ता त्यांनीं झुगारिली अहिताची ।
जन-सत्तात्मक-राज्यपद्धती वाढविली स्वहिताची ॥ ९८ ॥
अनेक शास्त्रें नवीन रचिलीं सुधारिलीं प्राचीन ।
प्रवास करुनी मेळविलें बहु इतिहासाचें ज्ञान ॥ ९९ ॥
अनेक परिनीं इंग्रज असती पाश्चात्यांत वरिष्ठ ।
दयालु कल्पक उदार ऐशी आहे ख्याति स्पष्ट ॥ १०० ॥
ईश दयेनें हेच जाहले आम्हावरतीं भूप ।
पुनरुन्नतिची म्हणून आम्हां आहे आस अमूप ॥ १०१ ॥

इंग्रजांची राज्यनीति.

इंग्रेजांची राज्यरीतिही विचित्र सखये आहे ।
थोरांथोरां न कळे तींतिल मर्म सकळगे पाहे ॥ १०२ ॥
उपमा तींतें तुझीच सखये योग्य गमे गे साजे ।
स्थिर-चित्ते तव मनाप्रमाणें स्थैर्य[1] तिचेंहि विराजे ॥ १०३ ॥

---

१ पार्लमेंटची रचना दृढ असून ती सुमारें ६०० वर्षांची जुनी आहे.

तद्गतिही तव-गतिशी मंदा[1] चंचल-नयने तीही ।
चंचल[2] भारी पारतंत्र्यही[3] तुजपरि तीचें पाहीं ॥ १०४ ॥
तुझ्याप्रमाणें विद्याप्रियता तिचीहि निःसीमा ती ।
हितप्रसंगीं अज्ञानातें तुझिया अनुकारी ती ॥ १०५ ॥
बाह्य-भूषणीं[4] आवड तूतें नटशी क्षणोक्षणीं गे ।
तसेंच तीही बाह्यात्कारीं करिते भारी सोंगें ॥ १०६ ॥
गूढ[5] तुझें मन तिचेंहि भारी रूप सुंदरी तूं ती[6] ।
प्रसन्न मजवर तूं तशि असते राजनिष्ठ जनिं गे ती ॥१०७॥
फार संशयी तूं तशि तीही आधीं नच विश्वासे ।
मधुर भाषणें तीहि तुझ्यापरि सुधेस लाजवि खासें ॥१०८॥
आर्जव[7] तूझ्यापरीच तीही भारी करून घेते ।
सेवा घेउनि फार तुझ्यापरि वितरी अल्प कृपेतें ॥ १०९ ॥
पारिजात[8]-सुमसम-कोमल तूं राज्यरीति ही तैशी ।
पूर्ण-चातुरी तीक्ष्ण-दृष्टि ही तुजपरि नसेल कैशी ॥११०॥

---

१ राज्य व्यवस्थेत सुधारणा हळुहळू होते घाईनें होत नाहीं. २ कायद्यांत वारंवार फेरफार होतात. पार्लमेंट सभेंत लिबरल कान्सर्वेटिवसंबंधानें वारंवार बदल होतो. ३ लोकमताच्या स्वाधीन राज्य सूत्रें आहेत. ४ दरबार वगैरे प्रसंगीं मोठा डामडौल होतो, उदाहरण १८७७ चा दरबार. प्रांतस्थितिविषयीं सरकारी रिपोर्ट मोठे झोकदार असतात. इतर राष्ट्रांस दिपविण्यास इंग्रेज सरकार पुष्कळ थाट करिते. ५ राजकीय गुप्त गोष्टीस अनुलक्षुन ही उक्ति आहे. ६ टापटीप विशेष असते अर्थात राजरीति सुंदर आहे. ७ न्यायमार्ग लांचट आहे यास अनुलक्षून हें ह्मणणें आहे. ८ तारायंत्र, आगगाडी, पोष्टखातें, वगैरे गोष्टी फार हितकर आहेत तथापि दुष्ट लोकांना थोड्या प्रयत्नानें त्यांत मोठे अनर्थ उडवून देतां येतात यास अनुलक्षून राजरीतीस नाजूक म्हटलें आहे.

सर्वस्वीं तूं स्ववश करिसि मज तसिं ती निजप्रजेला ।
मधुर बोलुनी तुजपरि तीही हरिते धन शक्तीला ॥ १११ ॥
[1]सुवृत्तपण जें सौंदर्यच तें वसे आपणापाशीं ।
अशा धरूं नको पूर्णचंद्रमुखि हृदयीं तूं गर्वाशी ॥ ११२ ॥
आंग्लराज-नयरीतीमध्यें सर्वत्राहि तें शोभे ।
[2]कैंच-कौटिल्या तशीच तुझिया स्वीकारी ती लोभें ॥११३॥
तुझिया [3]रागापरि तीचा किति पावति [4]परासुखाला ।
तुजवर आहे लुब्ध जसा मी प्रजाहि तिजवर लोला ११४
इंग्रेजांची राज्यरीतिही सर्व गुणांनीं पूर्णा ।
एक्यारीती वागविते बघ हर्षें सकलां वर्णा ॥ ११५ ॥
विलायतेंतिल सर्व जनांचें स्वमत कायदा तोच ।
भूपति त्याचे प्रधान करिती अमल तयापरि साच॥११६॥
वृत्तपत्रकें आणिक त्यांच्या प्रतिनिधिच्याहि सभा या ।
सर्व जनमत प्रकटुनि कळविति त्यांतें अमल कराया॥११७॥
प्रिये तुला जें काय हवें हें कळतां मी तें देतों ।
परि तूं मजला न सांगशी तर द्याया अशक्त होतों॥११८॥
यापरि जनमत कळतां त्यांच्या इच्छा पूर्णचि होती ।
प्रजामताविण तेथें कांहीं घडत नसे ही रीती ॥ ११९ ॥
राज्यरीतिही अश्रुत-पूर्वा आम्हां सकळां आर्यां ।
म्हणुनि कराया ये नच कांहीं करितां अपयश कार्यां ॥१२०॥
कसें राज्य हें मिळविति कैसें करिती चातुर्यें तें ।
ये यश यांना कैसें यांचें ज्ञान न आह्मां होतें ॥ १२१ ॥

---

१ Curvature is beauty यास अनुलक्षून वर कविता आहे. २ राजनीति कुटिल असते हें प्रसिद्धच आहे. ३ राग-प्रेम प्राकृत अर्थ क्रोध ४ पर असुख-अत्यंत दुःख. परा सुखाला अत्यंत सुखाला. परासु-गतप्राण होत्साते, खाला-आकाशाला.

हर गोष्टी ते संघशक्तिनें करिती चातुर्यानें ।
यशो-लाभही मिळविति ऐसें केवळ ऐकों कानें ॥ १२२ ॥
परंतु देखों किंवा समजों न शकों आम्ही कांहीं ।
ऐशीं गेलीं शतवर्षें हीं अज्ञानांतचि पाहीं ॥१२३ ॥
तीस कोटि जन आहों नसती दशांशही ते पाहा ।
परंतु विलसे नियम "श्रेष्ठा बलाहुनी सुमती" हा॥१२४॥

इंग्रेजांचीं सत्कृत्यें.

इंग्रेजांचें राज्य स्थापित झालें जों देशीं या ।
तोंच लागले सर्व जनां ते विद्यादान कराया ॥ १२५ ॥
नियमच आहे सविद्य लोकां होते सहज स्फूर्ती ।
शिकवूं अन्या, सतेज गोलक पसरी तेज सभोंतीं ॥१२६॥
ठायीं ठायीं विद्यापीठें स्थापित केलीं तूर्ण ।
खर्चहि त्यांचा सरकारांनीं चालू केला पूर्ण ॥ १२७ ॥
आर्यजनांची विद्या लभ्या असे द्विजांना मात्र ।
इंग्रेजांच्या परि विद्येला सर्वहि जाती पात्र ॥१२८॥
संस्कृत विद्या पूर्वीची ती आम्हां विस्मृत केली ।
इंग्रेजांनीं सर्व आपली प्रचलित येथें केली ॥१२९॥
त्यांच्या विद्येमाजीं पंडित आज जाहलों आम्ही ।
इंग्रेजांनीं प्रिये लाभ हा आम्हा दिधला नामी ॥ १३० ॥
सर्वहि लाभांमध्यें मोठा विद्या-लाभचि आहे ।
कीं विद्येनें इच्छित मिळतें कल्पतरूसम पाहें ॥ १३१ ॥
संस्कृत-विद्यामहत्व कळलें इंग्रेजांतें जेव्हां ।
उन्नति तीची व्हाया करिती नाना उपाय तेव्हां ॥ १३२ ॥
संप्रति गेली अस्मद्विद्या यूरोपीं तेथें ती ।
विद्वानांनीं गौरविली त्यां बहुविध लाभा देती ॥ १३३ ॥

सविद्य होतां आम्हां कळली पाश्चात्यांची रीती ।
अनेक शास्त्रीं त्यांची गतिही स्वातंत्र्यप्रियता ती ॥ १३४ ॥
आतां झाली राज्यरीतिही अवगत आम्हां त्यांची ।
सर्व जनांना येतां विद्या दृढता ती राज्याची ॥ १३५ ॥
नानाविद्यामूळ असे गे इतिहासाचें ज्ञान ।
पूर्वी आम्ही या शास्त्राला योग्य न दिधला मान ॥ १३६ ॥
सर्व मनुष्यें सम अधिकारहि असती त्यांचे तुल्य ।
तैसें आम्हां पूर्ण समजलें स्वातंत्र्याचें मूल्य ॥ १३७ ॥
मध्यकाळच्या भोळ्या मिथ्या सर्व कल्पना गेल्या ।
उदार आणिक सत्य अशा त्या त्यांच्या स्थानीं आल्या॥ १३८ ॥
धर्मस्वातंत्र्याचा लाभे लाभ प्रत्येकाला ।
स्वतंत्र झाले सर्व लोक निज-विचार दर्शविण्याला ॥ १३९ ॥
पेंढारी ठग यांचा देशीं बहुत उपद्रव होता ।
त्यांपासुनियां जीव-धनाचें नव्हता रक्षण कर्ता ॥ १४० ॥
सुख-संतोषें तदा राहणें केवळ अशक्य होतें ।
त्या कालाची स्थिति जाणविते सांप्रत-सुख-महिम्यातें ॥ १४१ ॥
संप्रति बहुधा न्याय सारखा मिळतो सर्व जनांतें ।
मिळवूं शकतो हर कोणीहि योग्य स्वातंत्र्यातें ॥ १४२ ॥
कैक आमच्या गोष्टी नव्हत्या आम्हांसचि माहीत ।
आंग्लांनीं त्या स्पष्ट दाविल्या धन्य तयांची रीत ॥ १४३ ॥
पूर्वींपासुनि अस्मत्स्त्रीगण मुकला स्वतंत्रतेला ।
विद्या लाभहि न मिळे त्याला अज्ञानी तो झाला ॥ १४४ ॥
येणें भारी अहित होतसे म्हणून सरकारांनीं ।
स्त्री-वर्गार्थ स्वतंत्रशाला स्थापित बहुत करोनी ॥ १४५ ॥
नाना-विद्यामार्गहि दिधले खुले करुनिया त्यांतें ।
करुनि कायदे नियमित केले प्रतिबंधक धर्मातें ॥ १४६ ॥

दृढतर–नियमीं प्रचार केला नष्ट सती जाण्याचा ।
सरकाराला संमत केला विधवाविवाह साचा ॥ १४७ ॥
त्यांनीं केल्या गोष्टी नव्हतों समर्थ ज्या करण्याला ।
स्त्री-वर्गोन्नतिसाठीं आम्हीं करणें बाकींच्याला ॥ १४८ ॥
पाश्चात्यांच्या अबला बहुधा सविंद्य सखि असतात ।
प्रपंच-शकटा चातुर्यानें वाहोनी नेतात ॥ १४९ ॥
देशोन्नतिचा शकट ओढण्या स्त्रीनर लागति दोघे ।
मतिशक्तींनीं तुल्यचि जरि ते इच्छित गतिला तो घे ॥१५०॥
विचार करुनी तूंच पहा गे अस्मत्स्त्रीगण कैसा ।
पुरुषगणाहुनि अबुद्धि विद्याहीन असे पशु जैसा ॥१५१॥
आरोग्याचे नियम न कळती शास्त्राच्या व्यवहारीं ।
अज्ञ असाति त्या निजबालांच्या संरक्षणिं ही भारी ॥१५२॥
स्वत्व न जाणुनि पहा सासवा करिती जाच सुनांस ।
संसाराच्या सोयी नेणुनि पेटति अभिमानास ॥ १५३ ॥
सासु प्रेमळ असली तरि ती वाटे दुष्ट सुनांतें ।
बोधाचेंही वचन तियेचें भासे जाचाचें तें ॥ १५४ ॥
ऐशा अनेक गोष्टी त्यांच्या घडती ज्ञानाभावें ।
परि त्या विद्या मिळतां होतिल सुमती सखि स्वभावें ॥१५५॥
एक वर्ग हा असा सुशीले अशक्त होय म्हणूनी ।
देशोन्नतिचा शकट राहिला कुंठित-गति होऊनी ॥१५६॥
स्त्रीनर दोघां ठायीं ईशें दिधलें तुल्यमतीतें ।
परि अस्मत्स्त्रीगणीं असुनिही व्यर्थपणा ये ती तें ॥ १५७॥
विकास तीचा विद्येविणगे कैसा होइल लोकीं ।
विकासते नच रविप्रकाशाविण नलिनीहि विलोकीं॥१५८॥
होइल त्यांच्या साहाय्याविण सुधारणा नच कांहीं ।
वायुगतीच्या साहाय्याविण सुगंध पसरत नाहीं ॥ १५९ ॥

बालविवाहादिक ज्या चाली आम्हांमाजीं दुष्ट।
स्त्रियांत विद्याप्रसार न तरी होतिल त्या नच नष्ट ॥१६०॥
म्हणुनि आमचा स्त्रीगण विद्याकलाकुशलतायुक्त ।
व्हाया शाला घालिति इंग्रज जन-कल्याणासक्त ॥ १६१ ॥
केल्या करिती इंग्रज ऐशा सुखदा-गोष्टी साच्या ।
असती आम्हां आर्यावर्तीं अनंत उपकृति त्यांच्या ॥१६२॥

आतां आम्ही उन्नतिसाठीं काय करावें.

हिंदुस्थानीं वसती हिंदू यवन पारशी ख्रिस्ती ।
संप्रति झाल्या एकचि नियमें बद्ध सर्व या जाती ॥१६३॥
आतां स्वोन्नति अन्य दिशेनें या सर्वांहीं कीजे ।
एक विचारें निज-कल्याणा दूर-दृष्टिही दीजे ॥ १६४ ॥
आमचाच हा देश ह्मणूनी पूर्वी मानिति हिंदू ।
परंतु आतां तसें न माना ऐसे बोधिति बिंदू[1] ॥ १६५ ॥
जे जे येथें वस्ती करुनी राहति त्यांचा देश ।
धर्म तयांचा भिन्न असो वा भजोत भिन्नहि ईश ॥१६६ ॥
दयालु इंग्रज सरकाराच्या राज्यच्छत्राखालीं ।
सुखदुःखाची तुल्य विभागी प्रजा सर्वही झाली ॥ १६७ ॥
जाति, धर्म, सुखसोयी, वर्तन, हवा देश रुचि अन्न ।
पान मत स्थिति भाषा सर्वहि इंग्रेजांचें भिन्न ॥ १६८ ॥
जेते ते, जित आम्ही, ते वर, आम्ही खालीं आहों ।
ते नृप, आम्ही प्रजा तयांची ऐशा स्थितींत राहों ॥ १६९॥
स्वतंत्र ते, परि परवश आम्ही परवशता ही खोटी ।
धनेश ते सखि सदा लागलों आम्ही पोटापाठीं ॥ १७० ॥

---

[1] शाहणे,

त्यांचा आहे देश हजारो मैल लांब अति-शीत ।
एक-जात ते भरतखंड हें उष्ण तसें बहु-जात ॥ १७१ ॥
विद्यापति ते, अविद्य आहों बहु-प्रकारें आम्ही ।
अशी विभिन्ना स्थिति आहे ही उभयांची बहु नामी ॥१७२॥
या योगानें बहुविध सखये चमत्कार होतात ।
दुर्दैवानें सर्वहि ते परि अस्मदहित करितात ॥ १७३ ॥
एकच दिसतो उपाय सगळ्या या अहिता टाळाया ।
सर्व जनांनीं एकी करुनी झटणें त्या साधाया ॥ १७४ ॥
स्वोन्नतिसाठीं युद्ध कपट वा सुधारणा कालीं या ।
करणें होइल मौर्ख्य सत्य कीं त्या कृति होतिल वायां ॥१७५॥
निजस्थितीच्या खऱ्या स्वरूपा कळवुनि निजरायाला ।
घ्यावें करुनी सुनीति-मार्गें स्वकीय कल्याणाला ॥ १७६ ॥
साध्य व्हावया उपाय हा गे सर्वहि विद्यायुक्त ।
व्हावे म्हणुनी प्रसार तीचा आम्हीं करणें युक्त ॥ १७७ ॥
तीस कोटि जन हिंदुस्थानीं यांतिल शतांश कांहीं ।
सविद्य असतां उन्नति योग्या स्थिति ही नोहे पाहीं॥१७८॥
सबलहि राज्यें अबल जाहलीं निर्बळ सबल जहालीं ।
आजवरी किति राष्ट्रें आलीं चक्रन्यायाखालीं ॥ १७९ ॥
याचें कारण विद्याविलसित सर्वत्रहि दिसतें हें ।
जयांत विलसे तेज तियेचें राज्य सुचिर तें राहे ॥ १८० ॥
ग्रीस रोम वा भरतखंड हें राष्ट्रें सखि टिकलीं तीं ।
बहुत काल, कीं तद्विद्येनें दुसरीं दिपलीं होतीं ॥ १८१ ॥
परंतु होता अल्पजनांवर प्रसाद गे विद्येचा ।
त्यांच्या शतपट जनांस नव्हता गंधहि सखये तीचा॥१८२॥
म्हणून सतत न टिकली त्यांची उन्नति, नष्टचि झाली ।
जाणतसों हें ग्रंथावरुनी रचले जे त्या कालीं ॥ १८३ ॥

निजकर्तव्य-ज्ञान असे जिस ऐशी जनता जैशी ।
अधिकाधिक ती अधिक कालही उन्नति टिकेल तैशी ॥१८४॥
निज-देशाच्या स्थितिच्या ज्ञाना प्रति-जन योग्य असावा ।
अशा प्रकारें देशीं विद्या—प्रसार झटुनि करावा ॥ १८५ ॥
सर्व जनांच्या संमतिनें मग राज्यस्थिति-नियमांचें ।
बंधन होतें स्वराज्य-सुखही मिळतें सकळां सांचें ॥ १८६ ॥
अशापरी जी उन्नति होते कधिंही ऱ्हास तियेला ।
लागत नाहीं सत्य जाण या प्रसन्न-मुखि नियमाला ॥१८७॥
यापरि ज्याचा पाया दृढ तें उन्नति-मंदिर झालें ।
पाश्चात्यांचें तसेंच आम्ही प्रिये पाहिजे केलें ॥ १८८ ॥
पाश्चात्यांचीं शास्त्रें त्यांच्या कलाकुशलता याया ।
तद्देशाला गमन पाहिजे केलें सर्व शिकाया ॥ १८९ ॥
आम्हांमध्यें असती ज्या ज्या अहितकारका रीती ।
त्या टाकाव्या प्रिये धरावी नच कोणाची भीति ॥ १९० ॥
परकीयांच्या उत्तम चाली उत्तम गुण ते घ्यावे ।
हळु हळु नव हित-गोष्टीविषयीं निजजन-मन वळवावें॥१९१॥
दैव, काल वा कलियुग यांच्या योगें सारें चाले ।
अहितप्रद या शुष्क समजुती टाकुनि द्याव्या बाले॥१९२॥
प्रयत्नवादा मनीं धरावें होतो प्रभुहि सहाय ।
व्यापारार्थी इंग्रजपरि त्यां राज्यलाभही होय ॥ १९३ ॥
अस्मत्संस्कृत-विद्या पहिली लुप्तप्राया राहे ।
अनेक-शास्त्रज्ञान तीमधें पुष्कळ भरलें आहे ॥ १९४ ॥
त्या विद्येला आपण करणें उर्जित हें अति योग्य ।
त्या योगानें परत निश्चयें येइल अस्मद्भाग्य ॥ १९५ ॥
या परि देशस्थिति-वर्णन सखि सांगितलें हें तूतें ।
उत्तम मध्यम-नीच-स्थितिच्या दर्शविलें हेतूतें ॥ १९६ ॥

पुनरुन्नतिचा विद्याशीलें कथिला एक उपाय ।
तो करितां सखि सिद्धि निश्चयें होय न त्यांत अपाय ॥ १९७ ॥
पुरुष स्त्री या दोघांनींही झटणें या कार्याला ।
करणें देशा ऊर्जित तैसें सार्थ-नाम आर्यांला ॥ १९८ ॥
जैशी जैशी येइल आम्हां माजि योग्यता तैसे ।
अधिकारातें मिळवूं, असती आंग्ल-हेतुही ऐसे ॥ १९९ ॥
पाश्चात्यांपरि जेंव्हां येइल शक्ति सखे आम्हांला ।
तेंव्हां इंग्रज देतिल हर्षे पूर्ण-स्वातंत्र्याला ॥ २०० ॥
आर्यांग्लांची मैत्री नंतर जगतीं बहु शोभेल ।
उभयांच्याही देशोन्नतिसह वृद्धि सदा पावेल ॥ २०१ ॥

आर्या.

यापरि गोड सुरांनीं निजदेशस्थिति कथून कांतेला ।
विश्रांति पावला तो देतों विश्रांति मीहि कवितेला ॥

समाप्त.

PRINTED AT THE '*Indira*' PRESS POONA.

D
245